# स्त्री शिक्षणातील समस्या व तरतुदी

**डॉ.देवेंद्र बालाजीराव हिंगोलीकर (जोषी)** ,प्राचार्य, ज्ञानवर्धिनी अध्यापक महाविद्यालय,हिंगोली.

**सौ.आशा अशोक येल्हेकर, प्राध्यापिका,** ज्ञानवर्धिनी अध्यापक महाविद्यालय, हिंगोली.

---


**प्रास्ताविक :–**

समाजामध्ये शिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. शिक्षणाच्या माध्यमातुनच व्यक्ती, समाज, राष्ट्र , यांची प्रगती होत असते. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती समृध्द परिपुर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकत नाही. म्हणूनच म्हटले जाते.

येषां न विद्या, न तपो न दानं !
ज्ञानं न शिलं, न गुणो न धर्मः!
ते मृत्यो लोके ननू भारभूता!
मनुष्य रुपेण मृगः चरान्ते!


शिक्षणाचे महत्व यातून स्पष्ट होते. शिक्षण ही प्रकाशित, प्रबुध्द आणि समर्थ करण्याची प्रक्रिया आहे. समाजाची व राष्ट्राची प्रगती होण्यासाठी व शिक्षणाचे सार्वत्रिकिकरण होण्यासाठी मुले व मुली या दोघांनाही शिक्षण मिळणे गरजेचे आहे. परंतू मुलांच्या तुलनेत मुलींचे शिक्षणाचे प्रमाण ग्रामीण भागातून अल्प दिसुन येतात. शिक्षणाचे सार्वत्रिकिकरणाचे शासनाचे जे उदिष्ट आहे ते पुर्ण होण्यासाठी स्त्री शिक्षणातील समस्या जाणून घेवून त्यावर शासनाने केलेल्या उपाययोजना पाहणे उपयुक्त ठरते.

शिक्षणाची गाडी चालची
माझी मैना घरातच राहिली




**1 भौतिक सुविधा :–**

आवडते मज मनापासुनी शाळा, लाविते लळा जशी माउली बाळा असे साने गुरुजींनी शाळेचे वर्णन केलेले आहे. मुलांना शाळेचे आकर्षण वाटावे अशा सुविधा शाळेत असणे गरजेचे आहे. काही शाळांचा अपवाद सोडला तर अनेक शाळांना भौतिक सुविधांची कमतरता दिसून येते. मुलींकरीता स्वतंत्र वर्ग, बैठक व्यवस्था, स्वच्छतागृहे, स्त्री शिक्षिका इ. बाबींची कमतरता असल्या कारणाने मुलींना शाळेत नकोसे वाटते.




2. **गळती व स्थगितीची समस्या :–**

मुलींच्या शिक्षणात दिसुन येणारी सर्वात मोठी समस्या गळती होय. चौथी– सातवी नंतर मुलींची गळतीची समस्या जास्त जाणवते. बरेच पालक आपल्या मुली मोठया झाल्यानंतर त्यांना मुलांसोबतच्या शाळेत पाठवित नाही तर काही मुली वारंवार एकाच वर्गात नापास होत राहिल्यामुळे शाळा सोडतात.

3. **शिक्षणाचा असमान दर्जा :–**

ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा दर्जा समान नाही. ग्रामीण भागात सोयी–सुविधा, अध्यापन, इमारत इ. बाबतीत अनेक अडचणी दिसून येते. ग्रामीण भागातून मुलींच्या शिक्षणाला फारसे महत्व दिले जात नाही. त्या तुलनेत शहरी भाग काही प्रमाणात विकसित आहे.

4. **पालकांचे दारिद्रय :–**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. बहुसंख्य जनता हि ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागात ब–याच प्रमाणात दारिद्रयाची समस्या आढळते. घराला आर्थिक हातभार लावण्यासाठी मुलींना सोबत कामाला नेले जाते.

5. **समाजाचा दृष्टीकोन :–**

अजुनही काही भाग वगळता मुलींच्या शिक्षणाकडे पाहाण्याचा दृष्टीकोण वेगळा आहे. मुली शिकल्या त्यांना स्वातंत्र दिले तर त्या बिघडतात. शिकलेल्या मुली बेशिस्त वर्तन करतात. मोठयांचा आदर करित नाही असा एक समाज दिसून येतो.

6. **पालकांची उदासिनता :–**

पालक जर निरक्षर, अडाणी, अज्ञानी असल्यास मुलींच्या शिक्षणबाबत उदासिन दिसुन येतात. मुली म्हणजे परक्याच धन तिला शिकवुन शेवटी ती दुस–याच्याच घरी जाणार. त्यामुळे तिला शिकवुन फायदा काय. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला अडथळा निर्माण होतो.

7. **समाजात गौण स्थान :– न स्त्री स्वातंत्र्यमहर्ति**

पुरुष प्रधान संस्कृती असलेल्या देशात स्त्रीयांना नेहमीच दुययम स्थान दिले जाते. मुलींना शिकवुन करायचे काय शेवटी त्यांना उंबरठयाच्या आत चार भिंतीच्या मध्ये चुल व मुल हे करायचे अशी समजुत आहे.

**8. धरकाम व भावंडाना साभाळावे लागणेः–**

आर्थिक परिस्थिती चांगली नसली तर आई–वडिल दोघेही कामासाठी बाहेर जातात. त्यावेळी मुलगी म्हणून तिला घरातील सर्व कामे व लहान भावंडांना सांभाळण्याचे काम करावे लागते.

**9. घरापासूनचे अंतर :–**

शाळा हि घरापासून खुप दुरवर असेल तर पालक आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यास तयार होत नाही. तसेच दळणवळणाच्या साधनाच्या अभावामुळे मुली शाळेत जात नाही.

**10. स्त्री–शिक्षिकांचा अभाव :–**

ज्या शाळेत स्त्री–शिक्षकांची कमतरता असते अशा शाळेत पालक आपल्या मुलींना पाठवित नाही.

स्त्री– शिक्षणाकरीता शासनाने केलेल्या उपाय योजना किंवा तरतुदी :–

संसाररुपी रथाचे स्त्री व पुरुष हे दोन चाके आहे. जर याचे एक चाक खराब झाले किंवा मागे राहिले तर रथ पुढे जाणार नाही. म्हणून संसाररुपी रथ व्यवस्थित पुढे जाण्यासाठी स्त्री व पुरुष दोघेही सारखे असावे लागेल. एक शिकलेला व दुसरा अशिक्षित राहुन चालणार नाही. यासाठी स्त्री शिक्षणात सुधारणा करण्यासाठी शासनाने स्त्री शिक्षणाला चालना मिळण्यासाठी पुढील प्रमाणे तरतुदी केल्या आहे.

**महत्वपूर्ण तरतुदी :–**

- प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत
- कायद्यापुढे सर्व समान
- मातृ प्रबोधन प्रकल्प
- सावित्रिबाई फुले दत्तक पालक योजना
- अहिल्याबाई होळकर मोफत बस सेवा योजना
- शाळेला लागुन पाळणाघर
- उपस्थिती भत्ता
- शालेय उपोषण आहार

**1. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत :–**

कलम 45 नुसार 6 ते 14 वयोगटातील मुलगा असो किंवा मुलगी यांना प्रा.शि. सक्तीचे व मोफत कले या कायद्याचे रुपांतर 51 अ हक्कात समाविष्ट केल्यामुळे प्रत्येकाला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. याविरुध्द न्याय मागण्याचाही हक्क मुलींना आहे.

**2. कायद्यापुढे सर्व समान :–**

कायद्यापुढे सर्व समान व सर्वांना समान संरक्षण कलम 14 नुसार मान्य केलेले आहे. त्यामुळे स्त्राी व पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही. शिक्षणामध्येही स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेता येते.

**3. मातृ प्रबोधन प्रकल्प :–**

1987 मध्ये महाराष्ट्र राज्य शै. संधोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ही योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत, 1. मातेला मुलींच्या शिक्षणाबददल जागरफक करणे 2. त्यांना मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी समजावुन सांगणे. 3. मुलींच्या नेतृत्व गुणांचा विकास करणे.

**4. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना :—**

ही राज्य पुरस्कृत योजना 1983 पासून सुरु करण्यात आली. आर्थिक अडचणीमुळे ज्या मुली शिक्षण होत नाही. अशा मुलींना दत्तक घेवुन त्यांना शिक्षणासाठी मदत करणे दरमहा 25 रु. ची मदत मुलींना करणे.

**5. अहिल्याबाई होळकर मोफत बस सेवा योजना :—**

गावापासून शाळेचे अंतर दूर असणे तसेच ग्रामीण भागामध्ये पुढील शिक्षणाची सोय नसल्याने मुलींना पुढील शिक्षणासाठी तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी शिक्षणास जावे लागते. त्याकरीता मुलींना प्रवासाची मोफत सेवा पुरविण्यासाठी 1995.96 पासून अहिल्याबाई होळकर मोफत बस सेवा योजना सुरु करण्यात आली. जेणे करफन मुलींचे पुढचे शिक्षण थांबवू नये.

**6. शाळेला लागून पाळणाघर :—**

ब—याच मुलींना आपले आई—वडिल कामाला गेल्यानंतर त्यांच्या भावंडांना सांभाळण्यासाठी शाळा सोडून घरी रहावे लागते. त्या मुलींनी शाळा सोडू नये व भावंडाकडेही लक्ष ठेवता येईल यासाठी शाळेला लागून पाळणाघर असावे.

**7. उपस्थिती भत्ता :—**

आर्थिक परिस्थितीमुळे पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवित नाही. अशा मुलींकरीता उपस्थिती भत्ता दिला जाते. रोज एक रुपया याप्रमाणे हा उपस्थिती भत्ता दिला जातो.

**8. शालेय पोषण आहार योजना :—**

1995—96 पासून महाराष्ट्र शासनाने मुलांच्या उपस्थिती करीता ही योजना सुरु केलेली आहे. जेणे करुन जे पालक आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना शाळेत पाठवित नाही. त्यांनी मुलांच्या आरोगयाच्या दृटीने पोषण आहारासाठी शाळेत पाठवतील.

उददेश :— विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, गळतीचे प्रमाण कमी करणे.

पदार्थ आहार :— मोड आलेली धान्य, खिचडी, दुध, बिस्कीट, अंडी

**स्त्री शिक्षणाच्या शिफारशीः—**

- ❑ स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिला जावा.
- ❑ स्त्री शिक्षणासाठी विविध योजनांना प्राधान्य दिले जावे.
- ❑ मुला.मुलींच्या शिक्षणास समान दर्जा करण्यात यावा.
- ❑ मुलीं करीता स्वतंत्र शाळा असाव्यात.
- ❑ मुलींना शाळेत पाठविण्यासाठी पालकांना जागृत करावे.
- ❑ दारात शाळा, म्हणजे 1 कि.मी. अंतरावर शाळा उघडाव्यात.
- ❑ मुलींसाठी अंशवेळ, रात्रीच्या शाळा असाव्यात.
- ❑ शाळेत स्त्री—शिक्षिका असाव्यात.
- ❑ मुलीं करीता स्वतंत्र स्वच्छतागृह असावीत.
- ❑ शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत द्यावी.

**समारोप :—**

स्त्रीचे जर सबलीकरण करायचे असेल तर स्त्रीला शिक्षण देणे गरजेचे आहे. बदलत्या आधुनिक काळात स्त्री— शिक्षणाला मोठया प्रमाणात परिवर्तन घडून येते. हे परिवर्तन घडवुन येण्यासाठी कुटूंब, समाज, राष्ट सर्वांच्या प्रयत्नातून हे सहज साध्य होत असते.

**संदर्भ ग्रंथ :—**


1. डॉ.मंगरुळकर मीना, भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण (2006), फडके प्रकाशन, कोल्हापुर.
2. डॉ.सो.उज्वला के.सदावर्ते, मराठवाडा आणि स्त्री शिक्षण, (2006)आदित्य पब्लिकेशन, नांदेड